**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित**
**ग्राहक तक्रार निवारण मंच**
**कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर**

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. ८४/२०१८-१९/ 78 दिनांक: १५.०४.२०१९

**आदेश**

**आदेश केस क्र. ८४(२०१८-२०१९)**

| | | |
|---|---|---|
| | सौ. रमिलाबेन दयालजी पटेल<br>४३० खजीरे औद्योगिक वसाहत<br>इचलकरंजी जि. कोल्हापूर | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | **पक्षकार** |
| २) | कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय इचलकरंजी | |
| ३) | उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उप विभाग इचलकरंजी ब | |

**आदेश केस क्र. ८५(२०१८-२०१९)**

| | | |
|---|---|---|
| | सौ. विमलाबेन अरविंदभाई पटेल<br>४३० खजीरे औद्योगिक वसाहत<br>इचलकरंजी जि. कोल्हापूर | **अर्जदार** |
| | **विरुध्द** | |
| १) | कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | **पक्षकार** |
| २) | कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय इचलकरंजी | |

15/4/2019

GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

३) उपकार्यकारी अभियंता
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
उप विभाग इचलकरंजी ब

**आदेश केस क्र. ८६(२०१८-२०१९)**

| | |
|---|---|
| श्री कश्यप अरविंद पटेल<br>४३० खजीरे औद्योगिक वसाहत<br>इचलकरंजी जि. कोल्हापूर | **अर्जदार** |
| **विरुध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर | **पक्षकार** |
| २) कार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय इचलकरंजी | |
| ३) उपकार्यकारी अभियंता<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उप विभाग इचलकरंजी ब | |

**कोरमः-**१.श्री ए.व्ही. देशपांडे, अध्यक्ष
२.श्री. एन.के. सदस्य सचिव,
३. श्री. पी. एस. पुजारी, ग्राहक सदस्य,

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## एकत्रित आदेश (common Order)

मी ए.व्ही. देशपांडे अध्यक्ष, ग्राहक तक्रार.निवारण मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

१. उपर निर्दिष्ट सर्व ग्राहक तक्रारी एकाच स्वरुपाच्या, असून त्यामध्ये कायदयांचा एकच मुद्दा असून एकाच स्वरुपाच्या मागण्या केल्याने व उभय पक्षांद्वारे सर्व तक्रारीमध्ये एकांच प्रकारचा युक्तिवाद झाल्यामुळे, हया एकत्रित आदेशाने , निर्णीत करण्यात येत आहेत.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

15/11/2019

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD. KOLHAPUR ZONE
महावितरण



## गा-हाण्याचे संक्षिप्त स्वरुप.

२) थोडक्यात हकीकत अशी की, तक्रारदार सौ. रमिलाबेन दयालजी पटेल, याना ग्राहक क्र.२५०३८९००९१४०, तक्रारदार सौ. विमलाबेन अरविंदभाई पटेल यांना ग्राहक क्र. २५०३८९००९१५० तर तक्रारदार श्री कश्यप अरविंद पटेल यांना ग्राहक क्र. २५०३८९००९१३० या ग्राहक क्रमांकानी विज पुरवठा करण्यात आलेला आहे. सौ. रमिलाबेन पटेल यांनी दिनांक १०.११.२००५ रोजी ओआरसी चार्जेस पोटी रक्कम रु.६०,४००/- तर तक्रारदार विमलाबेन अरविंदभाई पटेल यांनी दिनांक ११.१०.२००५ रोजी ओआरसी चार्जेस पोटी रक्कम रु. ६०,४००/- आणि तक्रार श्री कश्यप अरविंद पटेल यांनी दिनांक १०.११.२००५ रोजी ओआरसी चार्जेस पोटी रक्कम रु. ९०,७००/- भरलेली असून या सर्व रक्कमा म.रा.वि.वि.कं.मर्या. इचलकरंजी येथे भरलेल्या आहेत. महाराष्ट्र राज्य विद्युत आयोगाच्या केस क्र. २३/२००४ व इतर विविध ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या निकालाच्या आधारे तक्रारदाराना ओआरसीच्या रक्कमांचा व्याजासहित परतावा मिळण्याचा अधिकार प्राप्त झालेला असून त्यानुसार या सर्व तक्रारदारानी अतिरिक्त कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं.मर्या. इचलकरंजी यांच्याकडे रक्कमा परत मागण्यासाठी दिनांक ०५.०७.२०१८ रोजी स्वतंत्र अर्ज केले असून त्या सोबत आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडलेली आहेत. अतिरिक्त कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि.कं.मर्या. इचलकरंजी यांनी तक्रारदाराच्या दिनांक ११.१०.२०१८ रोजीच्या विज देयकामध्ये , अनुक्रमे रक्कम रु. ६५,९३१/-, रक्कम रु. ६५,९३१/-, तर रक्कम रु, ९९,००५/- अशा रक्कमा वर्ग केलेल्या आहेत. तथापि अतिरिक्त कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि,कं. मर्या. इचलकरंजी यांनी ओआरसी रक्कमेवरील व्याजाची आकारणी ही फक्त २०.०१.२००५ ते ३०.०४.२००७ या कालावधीकरताच केलेली आहे. तक्रारदाराच्या कथनानुसार ओआरसी चार्जेस पोटी घेतलेल्या रक्कमेवरील व्याजाची आकारणी प्रत्यक्ष रक्कम भरलेल्या दिनांकापासून ते प्रत्यक्ष रक्कमा देय दिनांकापर्यन्त व्हावयास हवी होती व त्याप्रमाणे सदर कालावधी करिता त्यानी भरलेल्या रक्कमेवर द.सा.द.शे. १२ टक्के व्याज दराने व्हावी व ओआरसी चार्जेस हिशोबाची प्रत तक्रारदाराना उपलब्ध व्हावी व सुधारित हिशोबातून बिल दिनांक ११.१०.२०१८ मध्ये वर्ग करण्यात आलेली रक्कम वजा करुन उर्वरीत रक्कम विनाविलंब पुढील विज बिलामध्ये वर्ग करावी. अशी मागणी या सर्व तक्रारदारांनी आपआपल्या तक्रार अर्जामध्ये केलेली आहे.

३. या सर्व प्रकरणांची नोटीस बजावल्यानंतर विज वितरण कंपनीने, अतिरिक्त कार्यकारी अभियंता म.रा.वि.वि. कं.मर्या. "ब" उपविभाग इचलकरंजी यांच्या मार्फत हजर होऊन आपले स्वतंत्र लेखी निवेदन त्या सर्व प्रकरणांत दाखल केलेले आहे.

४. केस क्रमांक ८४/२०१८-१९ मध्ये वि.प. कंपनीचे लेखी निवेदन असे आहे की, तक्रारदार सौ. रमिलाबेन दयालजी पटेल यांनी ४० अश्वशक्तीचे पॉवर लूम कनेक्शन २००६ साली मंजूर करुन घेतले होते व त्या वेळेला ओआरसी या स्किम अंतर्गत दिनांक २५.१०.२००५ रोजी रक्कम रु. ६०,४००/- भरलेली होती त्या ग्राहकाने सदर ओआरसीची रक्कम रु. ६०,४००/- च्या परताव्याची मागणी केली असता परिपत्रक क्र.मुअ/जी/म.रा.वि.वि.कं./०५०३९ दिनांक ०७.०३.२०१८ नुसार ६टक्के व्याज दराने त्याचे ऑक्टोंबर २०१८ चे विज बिलातून ओआरसी रक्कम रु. ६०,४००/- अधिक रक्कम रु. ५,५३१/- व्याजापोटी अशी एकूण रक्कम रु. ६५,९३१/- त्याच्या विज बिलातून समायोजित करुन परतावा करण्यात आलेला आहे. उपलब्ध परिपत्रक ६ टक्के व्याज दराने परतावा करणेबाबत असल्याने ग्राहकांचे मागणीनुसार १२ टक्के व्याज दराने परतावा करता

येत नाही अंतर्गत तक्रार निवारण कक्ष मंडल कार्यालय, कोल्हापूर यांनी आपल्या दिनांक २२.११.२०१८ च्या आदेशाने तक्रारदाराची १२ % याची मागणी फेटाळलेली आहे. हया तक्रार अर्जाचा विषय या मंचाने दिनांक ०९.०१.२०१९ रोजी निर्णित केलेल्या केस क्रमांक ४६/२०१८-१९ प्रमाणे असल्याने त्याच प्रमाणे या केसमध्ये देखिल आदेश पारित करण्यात यावी अशी मागणी विज वितरण कंपनीने केलेली आहे.

५. केस क्रमांक ८५/२०१८-१९ मध्ये वि.प. कंपनीचे लेखी निवेदन असे आहे की, तक्रारदार सौ. विमलाबेन अरविंदभाई पटेल यांनी ४० अश्वशक्तीचे पॉवर लूम कनेक्शन २००६ साली मंजूर करुन घेतले होते व त्यावेळेला ओआरसी या स्किम अंतर्गत दिनांक २५.१०.२००५ रोजी रक्कम रु. ६०,४००/- भरलेली होती त्या ग्राहकाने सदर ओआरसीची रक्कम रु. ६०,४००/- च्या परताव्याची मागणी केली असता परिपत्रक क्र.मुअ/जी/म.रा.वि.वि.कं./०५०३९ दिनांक ०७.०३.२०१८ नुसार ६टक्के व्याज दराने त्याचे ऑक्टोंबर २०१८ चे विज बिलातून ओआरसी रक्कम रु. ६०,४००/- अधिक रक्कम रु. ५,५३१/- व्याजापोटी अशी एकूण रक्कम रु. ६५,९३१/- त्याच्या विज बिलातून समायोजित करुन परतावा करण्यात आलेला आहे. उपलब्ध परिपत्रक ६ टक्के व्याज दराने परतावा करणेबाबत असल्याने ग्राहकांचे मागणीनुसार १२टक्के व्याज दराने परतावा करता येत नाही अंतर्गत तक्रार निवारण कक्ष मंडल कार्यालय, कोल्हापूर यांनी आपल्या दिनांक २२.११.२०१८ च्या आदेशाने तक्रारदाराची १२ % याची मागणी फेटाळलेली आहे. हया तक्रार अर्जाचा विषय या मंचाने दिनांक ०९.०१.२०१९ रोजी निर्णित केलेल्या केस क्रमांक ४६/२०१८-१९ प्रमाणे असल्याने त्याच प्रमाणे या केसमध्ये देखिल आदेश पारित करण्यात यावी अशी मागणी विज वितरण कंपनीने केलेली आहे.

६. केस क्रमांक ८६/२०१८-१९ मध्ये वि.प. कंपनीचे लेखी निवेदन असे आहे की, तक्रारदार श्री कश्यप अरविंद पटेल यांनी ६० अश्वशक्तीचे पॉवर लूम कनेक्शन २००६ साली मंजूर करुन घेतले होते व त्यावेळेला ओआरसी या स्किम अंतर्गत दिनांक २५.१०.२००५ रोजी रक्कम रु. ९०,७००/- भरलेली होती .त्या ग्राहकाने सदर ओआरसीची रक्कम रु. ९०,७००/- च्या परताव्याची मागणी केली असता परिपत्रक क्र.मुअ/जी/म.रा.वि.वि.कं./०५०३९ दिनांक ०७.०३.२०१८ नुसार ६टक्के व्याज दराने त्याचे ऑक्टोंबर २०१८ चे विज बिलातून ओआरसी रक्कम रु. ९०,७००/- अधिक रक्कम रु. ८,३०५/- व्याजापोटी अशी एकूण रक्कम रु. ९९,००५/- त्याच्या विज बिलातून समायोजित करुन परतावा करण्यात आलेला आहे. उपलब्ध परिपत्रक ६टक्के व्याज दराने परतावा करणेबाबत असल्याने ग्राहकांचे मागणीनुसार १२टक्के व्याज दराने परतावा करता येत नाही अंतर्गत तक्रार निवारण कक्ष मंडल कार्यालय, कोल्हापूर यांनी आपल्या दिनांक २२.११.२०१८ च्या आदेशाने तक्रारदाराची १२ % याची मागणी फेटाळलेली आहे. हया तक्रार अर्जाचा विषय या मंचाने दिनांक ०९.०१.२०१९ रोजी निर्णित केलेल्या केस क्रमांक ४६/२०१८-१९ प्रमाणे असल्याने त्याच प्रमाणे या केसमध्ये देखिल आदेश पारित करण्यात यावी अशी मागणी विज वितरण कंपनीने केलेली आहे.

७. वरील तिन्ही प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज रोजी मंचासमोर घेण्यात आली. तक्रारदारांतर्फे प्रतिनिधी श्री. मुकुंद माळी तर वि.प. कंपनीतर्फे सौ. तृप्ती अ. दिपंकर अतिरिक्त कार्यकारी अभियंता उपविभाग इचलकरंजी "ब" या हजर होत्या. त्यांचा युक्तीवाद ऐकून घेण्यात आला. आपले युक्तीवादाच्या दरम्यान श्री मुकुंद माळी यांनी तक्रारदारांची १२ टक्के व्याज दराने व्याजाची मागणी सोडून देत असून परिपत्रक क्रमांक क्र.मुअ/जी/म.रा.वि.वि.कं./०५०३९ दिनांक ०७.०३.२०१८ नुसार द.सा.द.शे. ६ टक्के दराने व्याज तक्रारदारांना त्यानी रक्कम भरलेल्या तारखेपासून ते प्रत्यक्ष रक्कम मिळेपर्यन्तच्या कालावधीकरिता मिळावे

GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD महावितरण



अशी मागणी केली. तर सौ. दिपनकर यांनी पुरवणी परिपत्रक क्र.मुअ/वि/D-IV/MERC/०५०३९ दिनांक ०७.०३.२०११ नुसार केवळ दिनांक २०.०१.२००५ ते ३०.०४.२००७ या कालावधीकरिताच, मा. राज्य विद्युत आयोगाने केस क्र. ८२/२००६ मधील आपल्या दिनांक १७.०५.२००७ व दिनाक २१.०८.२००७ मध्ये पारित केलेल्या आदेशानुसार व्याज देण्याचे बंधन असल्याने केवळ त्याच कालावधीकरिता म्हणजे दिनांक २१.०८.२००७ या तारखेपर्यन्त तक्रारदारांना व्याज देण्यात आलेले असून त्यापुढील काळाकरिता व्याज मागण्याचा अधिकार तक्रारदारांना येत नसल्याने तक्रारदारांची मागणी खारीज करावी अशी विनंती केली.

उभय पक्षाचे युक्तीवाद ऐकल्यानंतर आमच्या निष्कर्षाकरता खाजील मुद्दे उपस्थित होतात.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | तक्रारदारांची मागणी मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | अंशतः होय |
| २ | अंतिम आदेश? | खालील प्रमाणे |

आमच्या वरील निष्कर्षाची कारणे खालील प्रमाणे आहेत.

## कारणमिमांसा

८. **मुद्दा क्रमांक १:- मुद्दा क्रमांक १ व २ :-** प्रस्तुत सर्व प्रकरणांमध्ये तक्रारदारांनी विज पुरवठा घेतेवेळी सोबतच्या प्रपत्रात नमूद केलेल्या रक्कमा ORC चार्जेस, ORC सुपरव्हीजन चार्जेस , मीटर कौंस्ट चार्जेस इत्यादी वि.प. कंपनीकडे भरलेले आहेत ही बाब कंपनीने मान्य केलेली आहे. त्या रक्कमांबाबत विज कंपनीचा कोणताही उजर नाही. महाराष्ट्र राज्य विद्युत नियमाक आयोगाच्या ८२/२००६ मधील दिनांक १७.०५.२००७ व दिनांक २१.०८.२००७ या आदेशानुसार दिनांक २०.०१.२००५ ते दिनांक ३०.०४.२००७ या कालावधीत वसूल केलेल्या ORC चार्जेस सुपरव्हीजन चार्जेस, मीटर कॉस्ट इत्यादी रक्कमा व्याजासह परत कराव्यात असे आदेश आणि परिपत्रक झालेले आहेत व त्यानुसार या सर्व तक्रारदारांना त्यांनी भरलेल्या कलमातील रक्कमा व्याजासह परत मिळण्याचा अधिकार असेन तो परतावा व्याजासकट त्यांना विज बिलातून समायोजित करुन देण्यात आलेला आहे ही बाब विज कंपनीने मान्य केलेली आहे. तथापि या सर्व प्रकरणांमध्ये वादा मुद्दा केवळ एवढाच आहे की, तक्रारदारांना सदर परतावा द.सा.द.शे.६ टक्के व्याज दराने व्याजासह मिळण्याचा अधिकार आहे किंवा त्यांना त्यांच्या मागणी प्रमाणे द.सा.द.शे. १२ टक्के दराने व्याज मिळण्याचा हक्क आहे आणि ते व्याज त्यानी रक्कमा भरलेल्या तारखेपासून ते परतावा मिळाण्याच्या तारखेपर्यन्त हक्क आहे किंवा नाही.

९. या ठिकाणी हे नमूद करणे आवश्यक आहे की, तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री मुकुंद माळी यांनी पुरवणी परिपत्रक क्रमांक CE/Dist/D-IV/MERC/०५०३९ दिनांक ०७.०३.२०१८ मध्ये नमूद केलेल्या व्याज दराने व्याज देण्यात यावे व तक्रारदारांची द.सा.द.शे. १२ टक्के व्याजाची मागणी सोडून देत असल्याबद्दल या मंचासमोर प्रतिपादन केले. त्यानुसार तक्रारदारांची द.सा.द.शे. १२ व्याज दराने व्याजाच्या मागणीचा विचार करण्याची आवश्यकता नाही .तक्रारदारांनी ही मागणी सोडून दिलेली आहे.

१०. तथापि तक्रारदारांची रक्कमांचा भरणा केलेल्या तारखेपासून व्याज देण्याची मागणी मंजूर करावी लागेल असा या मंचाचा निष्कर्ष आहे. वि.प. कंपनीतर्फे हजर असलेले उभय अभियंत्यानी वर नमूद केलेल्या पुरवणी परिपत्रकांत नमूद केलेल्या "The period of interest paid will be from 20.01.2005 to 30.04.2007 as per MERCs dt.17.05.2007 & dt.17.08.2007 , in case no.82 of 2006" या वाक्याचा आधार घेत, केवळ २०.०१.२००५ ते ३०.०४.२००७ या कालावधी करिताच तक्रारदारांना व्याज मागण्याचा अधिकार आहे म्हणून केवळ त्याच कालावधी करीता तक्रारदारांना व्याजाची आकारणी करुन व्याज देण्यात आलेले आहे, असा युक्तीवाद केला. दुर्देवाने, वर नमूद केलेल्या पुरवणी पत्रकांचा तौलनिक अभ्यास करता, तसेच मा. राज्य नियमाक आयोगाच्या वर नमूद केलेल्या प्रकरणांतील आदेशांचा अभ्यास करता, सदर परिपत्रकाला वि.प. कंपनी नमुद करते तसा अर्थ देता येऊ शकत नाही. कायदयांच्या दृष्टीने देखिल वि.प. कंपनीने तर्फे करण्यात आलेले प्रतिपादन मान्य करता येत नाही. मा. विज नियमाक आयोगाने वर नमूद प्रकरणांत ORC चार्जेस सुपरव्हीजन चार्जेस किंवा मिटर कॉस्ट ही ग्राहकाकडून वसूल करता येत नाही आणि जर वसूल करण्यात आला असेल तर त्या रक्कमा व्याजासह ग्राहकांला परत कराव्यात, असा स्पष्ट आदेश पारित केलेला आहे. विज ग्राहकांला विज पुरवठा करण्याकरता आवश्यक त्या बाबी उभारण्याचे कर्तव्य विज वितरण कंपनीचे असून, केवळ DDF योजनेतील ग्राहक वगळता , इतर सर्व ग्राहकांनी केलेला खर्च त्यास परत मिळाव्यास पाहिजे हे कायदयांचे सुत्र , मा. सर्वोच्च न्यायालयापर्यन्त मान्य झालेले आहे. याचा अर्थ प्रस्तुत प्रकरणांतील तक्रारदारांकडून देखिल ORC चार्जेस , मिटर कॉस्ट इत्यादी रक्कमाची वसूली बेकायदेशीररित्या करण्यात आलेली होती . त्यामुळे Interest - in - lieu of damages, या कायदयाच्या सुत्रानुसार ज्या ज्या तारखाना अशी बेकायदेशीर वसूली करण्यात आली, त्या त्या तारखेपासून तक्रारदारांना, त्या त्या रक्कमांवर व्याज मिळण्याचा कायदेशीर हक्क आहे आणि तो हक्क वर नमूद केलेली परिपत्रके काढून घेत नाहीत. वि.प. कंपनीच्या अधिका-यांनी सदर परिपत्रकांचा चूकीचा अर्थ लावून केवळ परिपत्रकात नमूद केलेल्या कालावधीकरिता व्याज देऊन तक्रारदारांवर अन्याय करुन त्यांचे नुकसान केलेले आहे. तक्रारदारांना सोबतच्या प्रपत्रांत त्यांच्या त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकाना क्रमांक ३ मध्ये नमूद केलेल्या रक्कमांवर त्या त्या रकान्यातील तारखांपासून त्यांना, सदर प्रपत्रातील शेवटच्या रकान्यात दर्शविलेल्या समायोजनेच्या तारखेपर्यन्त द.सा.द.शे. ६ टक्के दराने व्याज मिळण्याचा हक्क आहे असा या मंचाचा निष्कर्ष आहे. तथापि वर नमूद केलेल्या कारणांमुळे तक्रारदारांना सदर रक्कमांवर द.सा.द.शे. १२ टक्के दराने व्याज देता येत नाही असा ही या मंचा निष्कर्ष आहे.सबब मुद्दा क्रमांक १ चे उत्तर आम्ही अशंतः होकारार्थी दिलेले आहे.

११. वर नमूद केलेल्या निष्कर्षानुसार हे सर्व तक्रार अर्ज अशंतः मंजूर करावे लागतील असा या मंचाचा निष्कर्ष असून त्या योग्य आम्ही खालील आदेश पारित करित आहोत.

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण

सबब आम्ही खालील आदेश पारीत करीत आहोत.

**आदेश**

१) तक्रार अर्ज क्रमांक ८४ , ८५ व ८६(२०१८-१९) अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) विज वितरण कंपनीने यातील सर्व तक्रारदारांच्या भरणा केलेल्या रक्कमांवर रक्कमा भरलेल्या तारखेपासून प्रत्यक्ष रक्कम परत करण्याच्या तारखेपर्यन्त द.सा.द.शे ६ टक्के दराने व्याजाची आकारणी करुन , त्यातील प्रत्येक ग्राहकास परतावा केलेल्या रक्कमा वगळून उर्वरीत रक्कमा त्या त्या तक्रारदारांस या आदेशाचे तारखेपासून एक महिन्यात रोखीने किंवा पुढील महिन्याच्या विज बिलातून समायोजित करुन परतावा करावा व तसा आदेश या मंचास सादर करावा असा आदेश पारित करण्यात येतो.

३) या आदेशाची मुळ प्रत केस ८४(२०१८-१९) मध्ये ठेवून त्याच्या सांक्षाकीत प्रती केस क्र. ८५(२०१८-१९) केस क्र. ८६(२०१८-१९) मध्ये ठेवण्यात याव्यात.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

15/4/2019 | 15/04 | 15/4/2019
---|---|---
( पी.एस. पुजारी) | (एन.के.ताडे ) | (ए.व्ही. देशपांडे)
ग्राहक सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष

CONSUMER GRIEVANCE REDRESSAL FORUM, KOLHAPUR ZONE
MAHARASHTRA STATE ELECTRICITY DIST. CO. LTD.
महावितरण